ISSN 2278-8808
An International Peer Reviewed
SJIF 2013 = 4.194
SCHOLARLY RESEARCH JOURNAL
FOR INTERDISCIPLINARY STUDIES

# शिक्षण आणि अर्थशास्त्र

**दिगंबर दुर्गाडे, Ph. D.**

*टिळक शिक्षण महाविद्यालय, पुणे–४११०३०*

**Abstract**

*सर्वच शिक्षणतज्ज्ञ व अर्थतज्ज्ञांनी शिक्षणामधील आर्थिक गुंतवणूकीला महत्व दिले आहे. जेवढया प्रमाणामध्ये गुंतवणूक केली जाते तेवढया प्रमाणात शिक्षणाची गुणवत्ता वाढलेली दिसते. शिक्षणाचे विविध घटकांना मोबदला दिला जातो. त्याचप्रमाणे पायाभूत सोईसुविधा, वेतन, तंत्रज्ञान, इतर अत्यावश्यक गोष्टींसाठी निधीची आवश्यकता असते. त्यासाठी प्रत्येक शिक्षण संस्थेला स्वत:चे पायावर उभे राहणे आवश्यक असते. त्यासाठी शासन, इतर सेवाभावी संस्था, सी.एस.आर निधी, शुल्क, देणग्या यावर अवलंबून रहावे लागते. शिक्षणाला उद्योगाचे स्वरूप प्राप्त झाले आहे. जागतिकीकरण, खाजगीकरण व उदारिकरणामुळे शिक्षणामध्ये गुंतवणूक, स्पर्धा व गुणवत्ता यामध्ये प्रचंड वाढ झालेली आहे. त्यामुळे निधीची आवश्यकता व पुरवठा यामध्ये दरी निर्माण झाली आहे. ही दरी भरून काढणे हे शिक्षण व्यवस्थेसमोरील आव्हान आहे.*

*Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com*

## १. प्रस्तावना :

शिक्षण हे मानवी जीवनाला लाभलेले वरदान आहे. शिक्षणाच्या माध्यमातूनच मानव जातीने प्रगती साध्य केली आहे. शिक्षणामुळेच मानव व इतर प्राण्यांच्या प्रगतीमध्ये मोठा फरक जाणवतो. पूर्वीच्या काळी आजूबाजूच्या समाजाच्या माध्यमातूनच मुलांना शिक्षण दिले जात असे. औपचारिक शिक्षणाची पध्दती अस्तित्वात आली नव्हती. प्राचीन काळी राज्याचा व शिक्षणाचा संबंध नव्हता. त्या काळात गुरूकूल पध्दती किंवा आश्रम पध्दती प्रचलित होती. ज्ञान संपन्न ऋषीमूनी हे आपल्या आश्रमातून जिज्ञासू, शिक्षण पिपासू व बुध्दीमान शिष्यांना शिक्षण देत. हे ऋषीमूनी किंवा आचार्य जसे ज्ञानी तसेच नि:स्पृह, विरागी व चारित्रय संपन्न होते. ते पूर्णपणे स्वतंत्र होते. सत्ताधारी सम्राटांचा देखील त्यांच्यावर अधिकार चालत नसे. राजसत्तेपेक्षा गुरूसत्ता ही अधिक प्रभावी होती. ऋषीमुनींच्या आश्रमांचा खर्च शिष्यांनी दिलेल्या गुरूदक्षिणेवर चाले. धनिक वर्गाकडून, विशेषत: श्रीमंत शिष्यांकडून गुरूदक्षिणेच्या रूपात अधिक आर्थिक सहाय्य मिळे. कधी कधी राजाश्रय देखील मिळे. मात्र राज्यसत्ता त्यांच्या कार्यात हस्तक्षेप करीत नसे. बौध्द काळात व गुप्त काळात शिक्षणाचे प्रमाण खूपच वाढले. नालंदा, तक्षशीला वलभी या सारखी प्रचंड मोठी व जगप्रसिध्द विदयापीठे स्थापन झाली. त्यांना तत्कालीन गुप्त आदि सम्राटांकडून सर्व प्रकारचे सहाय्य मिळे. परंतु शिक्षण संस्थांचे कार्य स्वतंत्र व स्वायत्त होते.

प्राचीन काळी भारतीय शिक्षण संस्कृतीचा सर्वांगीण विकास झालेला होता. याविषयी जेम्स जीन्स म्हणतात,

"At a time when our ancestors were thinking of killing animals or one another India, perhaps had Philosophy which was very mature, also art, poetry, literature and in fact, everything which England had not."

यावरून असे लक्षात येते की, सर जेम्स लीन सारख्या व्यक्तीलाही असे वाटते की, ज्यावेळी भारतात तत्वज्ञान, कला, काव्य, साहित्य यांनी उच्चतम पातळी गाठली होती, त्यावेळी इंग्लंडमधील आमचे पूर्वज प्राण्यांना व एकमेकांना मारण्याचा विचार करीत होते. भारताला ज्ञानाची महान परंपरा आहे ती परंपरा पुढे न्यावी लागेल.

भारतात शिक्षण व राज्यव्यवस्था यांचा जवळचा संबंध प्रस्थापित झालेला दिसून येतो. राज्यसंस्था शिक्षणासाठी गुरूकुल व आचार्यांना मदत करीत असत. शिक्षणाकडे एक उपभोगाची वस्तू म्हणून पाहिले जात असे. शिक्षणासाठी खर्च आवश्यक असला तरी तो अनुत्पादक आहे, अशी समाजात धारणा होती. त्याकाळी शिक्षणाकडे गुंतवणूक म्हणून पाहिले जात नव्हते. शिष्यांव्दारे मिळालेल्या गुरूदक्षिणा ही गुरूकुलांचा उत्पन्नाचा एक भाग होता. शिक्षण ठराविक वर्गांनाच उपलब्ध होते. आज औपचारिक शिक्षणाचे प्रमाण मोठया प्रमाणार वाढले आहे. जागतिकीकरणाचा उदय झाला आहे. त्यामुळे शिक्षणाची गुणवत्ताही जागतिक दर्जाची असल्याची गरज भासू लागली आहे.

**२. जागतिकीकरण आणि शिक्षण :**

आजचे जग हे प्रचंड वेगाने बदलत आहे. बदल हा जगण्याचा स्थायी भाव झाला आहे. हा समाज ज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञानाची कास धरणारा आहे. ज्ञानाचा प्रचंड विस्फोट झाला आहे. खाजगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरणाचे वारे सध्या जगात सगळीकडेच वाहत आहेत. जागतिकीकरणामुळे आज सर्वच क्षेत्रात प्रचंड स्पर्धा निर्माण झाली आहे. शिक्षण क्षेत्रही त्यात मागे नाही. उदारीकरणामुळे वस्तु व सेवांची आयात निर्यात सोपी झाली आहे. व्यापाराचे नियम शिथिल झाले आहेत. अनावश्यक नियम, कायदे बदलण्याची प्रक्रिया जगभरात चालू आहे. सरकारने अनेक क्षेत्रामध्ये खाजगीकरणाचा पुरस्कार केला आहे. शिक्षण क्षेत्रामध्येही फार मोठया प्रमाणावर खाजगीकरण झालेले आहे. देशामध्ये अनेक खाजगी शाळांचे पेव फुटले आहे. खाजगी भांडवलदारांनी शिक्षण क्षेत्रातही मोठया प्रमाणावर गुंणवणूक केली आहे. प्रचंड भौतिक सोयी सुविधा, तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर, उत्तम शिक्षक, स्पर्धात्मक वातावरण, पंचतारांकित संस्कृती यांनी शिक्षण क्षेत्रामध्ये प्रवेश केला आहे. डोळे दिपून जावेत अशी परिस्थिती काही शिक्षण संस्थामधून पाहावयास मिळत आहे. सोबतच जोडीला परदेशी विद्यापीठे व परदेशी शाळांचा शिरकाव भारतीय शिक्षण क्षेत्रामध्ये झाला आहे. परिणामी भांडवल गुंतवणूक, गुणवत्ता, स्पर्धा व तंत्रज्ञानाच्या स्पर्धेने अत्यूच्च टोक गाठले आहे. परिणामी शिक्षण क्षेत्रात ठराविक शिक्षण संस्थांची मक्तेदारी निर्माण होवू शकते. अर्थशास्त्रीय सिध्दांतानुसार बाजारामध्ये पूर्ण स्पर्धा असेल तर सर्वच लाभार्थींचे हित साधले जावू शकते. मात्र भारताच्या शिक्षण क्षेत्रामध्ये जर काही ठराविक धनदांडग्या व परदेशी शिक्षण संस्थांची मक्तेदारी निर्माण झाली व सीमांत गुंतवणूक असणाऱ्या संस्था या स्पर्धेत टिकाव न लागल्यामूळे बाहेर पडल्यास या महागडया शाळांची भरमसाठ फी भरणे, छोटे शेतकरी, असंघटीत क्षेत्रात काम करणारे मजूर, गरीब, आदिवासी, कमी उत्पन्न असणाऱ्या लोकांना परवडणार नाही. कारण काही शाळांची वार्षिक फी लाखो रूपयांपर्यंत आहे. तेवढे उत्पन्न एक वर्षांतसुध्दा कुटूंबाला मिळत नाही. मग असे पालक मुलांच्या शिक्षणाची फी कशी भरणार? या परिस्थितीमध्ये आर्थिक व शैक्षणिक विषमतेमुळे भारतात गरीब—श्रीमंत, आहेरे—नाहिरे वर्गात फार मोठी दरी निर्माण होवू शकते. त्यामुळे सामाजिक स्वास्थाला धोका पोहोचू शकतो. प्रचंड शुल्क असणाऱ्या शाळांमध्ये गरीबीमुळे मुलांना प्रवेश न मिळाल्यास व त्याचवेळी सरकारी व त्यागाच्या भावनेतून काम करणाऱ्या शाळा बंद पडल्यास किंवा त्यांची संख्या घटत गेल्यास पुन्हा शैक्षणिक गुणवत्तेमध्ये मोठी विषमता निर्माण होईल. त्यासाठी शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण, गुणवत्तापूर्ण शिक्षण व देशातील मनुष्यबळाचा नीटपणे

विकास साधायचा असेल तर शिक्षणामध्ये सरकारला भांडवली गुंतवणूक करावीच लागेल. त्यासाठी सरकारी, महानगर पालिका, नगर पालिका व जिल्हा परिषदांच्या शाळांची संख्यात्मक व गुणात्मक वाढ करणे हा सर्वोत्तम पर्याय असेल. सरकारने शिक्षणामधील गुंतवणूक थांबवली, शिक्षण क्षेत्रातून हळूहळू अंग काढून घेतले आणि निर्गुंतवणूकीचे धोरण स्वीकारले तर सामान्य लोकांपासून शिक्षण दूर जाण्यास वेळ लागणार नाही.

**३. शिक्षण आणि अर्थशास्त्र:**

अर्थशास्त्रज्ञ 'ॲडम स्मिथ' यांनी आपल्या संशाधनाव्दारे असे सिध्द केले की, शिक्षणामधील गुंतवणूक अनुत्पादक तर नसतेच उलटपक्षी ती उत्पादन वाढीसाठी आवश्यक असते, शिक्षणातून व्यक्तिच्या बुध्दीचा व कार्यक्षमतेचा जो विकास विकास होतो तो राष्ट्राच्या आर्थिक विकासास सहाय्यभूत ठरतो, याबरोबरच 'ॲडम स्मिथ' यांनी राष्ट्रनिर्मितीच्या कार्यात शिक्षणास अग्रक्रम देण्याचा आग्रह धरला होता. भारतीय अर्थशास्त्रज्ञ 'प्रा. व्ही. के. राव' यांच्या मते शिक्षणाकडे उपभोग्य वस्तू म्हणून न पाहता राष्ट्रीय गुंतवणूक म्हणून पाहिले पाहिजे. कोणत्याही देशाची आर्थिक प्रगती ही तो देश आपली शिक्षणव्यवस्था किती परिणामकारकपणे राबवतो यावर अवलंबून असते. शिक्षणव्यवस्था जर योग्य असेल तर त्याची परिणीती देशाची संपत्ती वाढविण्यात होते. जे राष्ट्र आपल्या राष्ट्रीय उत्पन्नातील मोठा हिस्सा शिक्षणावर खर्च करते ते राष्ट्र आर्थिक प्रगतीही अधिक करते. या उलट शिक्षणावरील खर्चात कपात करणारे राष्ट्र उत्पादनाच्या व विकासाच्या दृष्टीने मागास राहते. प्रा. हारबिसन व मायर्स यांनी शिक्षण व आर्थिक विकाससंबंधी विस्तृत माहिती गोळा करून शिक्षण निर्देशांक व आर्थिक निर्देशांक यांच्यातील परस्पर संबंध स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला. यातून त्यांनी विदीत केले की, शिक्षणाचा निर्देशांक जर उच्च पातळीवर असेल तर आर्थिक प्रगतीचा निर्देशांकही वरच्या पातळीवर असतो.

कोणत्याही देशाचा विकास हा त्या देशात उपलब्ध असलेल्या गुणवत्तापूर्ण भांडवलावर अवलंबून असतो व हे गुणवत्तापूर्ण भांडवल निर्माण करण्याची जबाबदारी मुख्यत्वेकरून शिक्षण पार पाडत असते. देशाच्या तात्कालिक गरजा कोणत्या आहेत. तसेच कोणत्या प्रकारची कौशल्ये भविष्यात आवश्यक आहेत या बाबींचा विचार करून परिणामकारक शिक्षण योजना आखण्यात आली तर राष्ट्राच्या प्रगतीस चालना मिळते.

थोडक्यात शिक्षणामुळे व्यक्तिच्या कार्यक्षमतेत, उत्पादन क्षमतेत वाढ होऊन राष्ट्रास प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरीत्या फायदे होतात म्हणून राष्ट्रविकासासाठी शिक्षणाकडे दुर्लक्ष करून चालणार नाही 'आल्फ्रेड मार्शल' यांच्या मते शिक्षणावर होणारा खर्च हा खर्च नसून राष्ट्रीय गुंतवणूक आहे. त्यासाठी गुणवत्तापूर्ण शिक्षण देणे आवश्यक आहे.

ब्रिटन मधील १९८५ च्या नवीन इन्सायक्लोपीडिया नुसार ''अध्यापन हा जगातील सर्वात मोठा व्यवसाय आहे. जसजसा मानवी विकास होत गेला, तसतसा शिक्षणात आणि शैक्षणीक पध्दतीत लक्षणीय बदल होत गेला. सर्वोकृष्ट अनुकूल मानवी स्त्रोतांचा वापर करण्याची गरज भासू लागली. त्यासाठी शिक्षणाचे नियोजन आणि त्यासाठी अर्थ पुरवठा याकडे लक्ष देणे आवश्यक बनले.

१९६३ मध्ये टी. ब्ल्यू शल्टझ यांनी शिक्षण व आर्थिक विकास यांचा निकटचा संबंध असल्याचे सांगितले. त्याचे मत व विचार अर्थशास्त्रज्ञांना पटले. तेव्हापासून शिक्षणाच्या विकासाकडे जागरूकतेने पाहीले गेले. मौल्यवान अशा शैक्षणिक आस्थापनामध्ये अर्थशास्त्राचा समावेश केला गेला. पूर्वी शिक्षणाचा कल फक्त सांस्कृतिक शिक्षणाकडे झुकलेला होता. हया

नवीन दृष्टीकोनामुळे शिक्षण हे अर्थशास्त्राच्या गणती (मोजमाप) च्या पलीकडे आहे असे मानले गेले तसेच शिक्षणामध्ये मूल्य व परतावा हयांच्या पेक्षा कितीतरी व्यापक अर्थ दडल्याचे स्वीकारले आहे.

**४. मानवी संसाधन विकासाचा आर्थिक दृष्टिकोन :—**

आधुनिक युगात मानवी संसाधन विकासाच्या आर्थिक दृष्टिकोनास खूप मोठा इतिहास आणि उच्च दर्जाची वैचारिक पातळी लाभलेली आहे. ॲडम स्मिथ यांनी असे दर्शविले की, व्यक्तीच्या क्षमता हया त्याला शिक्षणासाठी उपलब्ध झालेल्या संधीवर अवलंबून आहेत. १९५० च्या दशकात विकास केंद्री मानवी संसाधन विकास पध्दतीने नवीन आर्थिक विकासाला व्यापले, (हिर्षमन १९८१ लेवीस १९६५, मिडरल १९६८) तसेच तेव्हापासून मानवी भांडवलावरील अर्थशास्त्रज्ञांचे विचार व लिखाण वाढले. (उदा. नोबल पारितोषिक विजेते अमर्त्यसेन) सेन सारख्या विचारवंतांनी व्यक्तीच्या पायाभूत क्षमता व अधिकार यांच्या विश्लेषणावर भर दिला.

सेन (१९९२) यांच्या मतानुसार व्यक्तीच्या पायाभूत क्षमता व अधिकार विस्तृत करण्यासाठी व्यक्तीला विकसित करा, जेणेकरून समाजाचा व अर्थव्यवस्थेचा विकास होईल. दुसऱ्या शब्दात सांगायचे तर, मानवी संसाधन विकासाचा दृष्टिकोन हा विकासाच्या इतर महत्वाच्या घटकांचा उपसंच आहे आणि व्यक्तीचे अधिकार व क्षमता वाढविण्याच्या मोठया उद्‌दिष्टावर आधरित आहे. व्यवसायिक वृध्दी व आर्थिक विकासाच्या संकुचित दृष्टिकोनापेक्षा हा दृष्टिकोन वेगळा आहे. आंतरराष्ट्रीय नाणेनिधी आणि जागतिक बॅकेसारख्या आंतरराष्ट्रीय संस्थांनी १९९० पर्यंत याला प्राधान्य दिले. या अंतर्गत मुक्त बाजारपेठा आणि व्यापार हे आर्थिक वृध्दी व विकासासाठी आवश्यक आहे असे सुचविले गेले. यात विकासाचे मानक ‘‘सकल देशांतर्गत उत्पन्न’’ असे ठरविले. ‘‘सकल देशांतर्गत उत्पन्न’’ हे वितरणाच्या मुद्‌दयावर काहीही माहिती देत नाही, कोणाला किती फायदा मिळाला व कोणाला निरोगी राहण्याची क्षमता प्राप्त झाली, इ. बद्‌दल माहिती देत नाही. सकल देशांतर्गत उत्पन्न वाढीसाठी गुणवत्तापूर्ण शिक्षणाची आवश्यकता असते.

**५. मानवीसंसाधन विकासाची गरज :—** मानवी संसाधन विकास, शिक्षण, प्रशिक्षण आणि आयुष्यभरासाठी अध्ययनाच्या धोरणामुळे

अ) आयुष्यभर अध्ययन व कामधंदा करण्याची क्षमता हे सुयोग्य उद्योग निर्माण करण्यासाठी आणि निरंतर आर्थिक व सामाजिक विकास साधण्यासाठीच्या धोरणांचा भाग आहेत, असे मानले गेले.

ब) आर्थिक व सामाजिक उद्‌दिष्टांना समान महत्व देऊन वैश्विकरणाच्या संदर्भात अखंड आर्थिक विकास, ज्ञान व कौशल्यांवर आधारित क्षमतांचा विकास, योग्य कामाची वाढ, नोकरी टिकविणे, सामाजिक आंतरक्रिया आणि गरीबी हटाव इत्यादींना प्रोत्साहन मिळाले.

क) नवीन उपक्रम, स्पर्धात्मकता, उत्पादकता, आर्थिक वृध्दी, चांगल्या नोकऱ्यांची निर्मिती आणि लोकांची नोकरी करण्याची पात्रता यावर दिलेला भर नवीन उपक्रम व नोकरीच्या संधी निर्माण करतो. त्यासाठी शिक्षणात नव्या दृष्टीकोनाची व प्रशिक्षण कौशल्यांची आवश्यकता आहे.

ड) अनौपचारिक आर्थिक व्यवस्थेचे मुख्य आर्थिक जीवनात रूपांतर करण्यासाठीचे आव्हान, नवीन चांगल्या नोकऱ्या निर्माण करण्यासाठीची धोरणे व कार्यक्रम, शिक्षण व प्रशिक्षणाच्या संधी तसेच आधी मिळविलेले

ज्ञान व कौशल्यांचा औपचारिक आर्थिक व्यवस्थेत वापर करण्यासाठी कर्मचाऱ्यांना मदत करणे आवश्यक आहे.

इ) सार्वजनिक व खाजगी गुंतवणूकीवर भर देणे – माहिती व तंत्रज्ञानाचा शिक्षण व प्रशिक्षातील पायाभूत गरजांसाठी तसेच शिक्षक व प्रशिक्षकांना प्रशिक्षण देण्यासाठी स्थानिक, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय आंतरजालाचा उपयोग करावा.

फ) शिक्षण व प्रशिक्षणाच्या सहभागातील तफावत कमी करावी.

इत्यादी वरील बाबींमुळे मानवी संसाधन विकासाची आवश्यकता लक्षात येते.

**६. इतर संसाधनांच्या संदर्भात मानवी भांडवल :–**

बहुतेक लोकांसाठी भांडवल म्हणजे बॅकेतील खाती, भाग यंत्रसामुग्री, आर्थिक भांडवल व कारखाने इ. असते. हे सर्व भांडवलाचेच प्रकार आहेत आणि ते कालातराने फायदेच करून देतात, हे प्रकार म्हणजेच केवळ भांडवल नाही तर शाळा शिकणे, संगणक प्रशिक्षण कार्यक्रम, आरोग्य विषयक खर्च, वक्तशीरपणा आणि प्रामाणिकपणा इ. गोष्टीसुध्दा भांडवलेच आहेत. कारण त्यामुळे उत्पन्न वाढते. प्रकृती सुधारते किंवा व्यक्तीला आयुष्यभरासाठी चांगल्या सवयी जडतात. म्हणूनच अर्थशास्त्रात शिक्षण, प्रशिक्षण, आरोग्य इ. खर्च हे मानवी भांडवलातील गुंतवणूक आहे असे समजले जाते.
शिक्षण, प्रशिक्षण आणि आरोग्य हे मानवी भांडवलातील सर्वात मोठी गुंतवणूक आहे. अनेक अभ्यासातून असे दिसून आलेले आहे की, अमेरिकेमध्ये शाळा व महाविद्यालयातील शिक्षणामुळे व्यक्तीचे उत्पन्न वाढलेले आहे.

**७. विकासाचे त्रिकोणीय तत्व :**

देशाचा विकासाच्या प्रक्रीयेची निश्चिती खालील त्रिकोण तत्वाव्दारे होते.

१) अर्थ

२) शिक्षण

३) सुसंघटीत राज्यव्यवस्था

हया त्रिकोणी संबंधांच्या सहभागाने समाजातील प्रगतीचे, विकासाचे व बदलाचे नियोजन करता येते.

अर्थ, शिक्षण व सुसंघटीत राज्यव्यवस्था ही कोणत्याही देशाचे सर्वात मोठे शक्तीस्थान आहे. ते एक प्रभावी साधन आहे. हया शक्ती स्थानामुळे सकारात्मक व नकारात्मक बदल होऊ शकतात. लोकांना सुविधा पुरविण्यासाठी हया त्रिकोणीय स्त्रोतांचा जास्तीत जास्त उपयोग केला पाहिजे. याचाच अर्थ त्रिकोणाच्या प्रत्येक बाजूने आपल्या परीने स्वत:शी सकारात्मक प्रयत्न केला तर उर्वरीत दोन बाजूंचा आपोआप योग्य विकास होईल.

**८. शिक्षण ही एक आर्थिक गुंतवणूक :**

शिक्षणामध्ये केलेल्या गुंतवणूकीमधूनच आर्थिक प्रगती साधली जाते. शिक्षणामधून तयार झालेले मनुष्यबळ ज्ञान, कौशल्य व वाढलेल्या क्षमता यामुळे राष्ट्राच्या आर्थिक उत्पन्नामध्ये भर घालण्याचे काम करते. शिक्षणामधून चांगल्या प्रकारचा परतावा मिळवायचा असेल तर शिक्षणामध्ये मोठया प्रमाणावर आर्थिक गुंतवणूक करणे आवश्यक आहे.

१. शिक्षणामुळे व्यक्तिची मूल्ये, अभिवृत्ती, अभिरूची व कौशल्ये यांचे विकसन होते. त्यामुळे त्यांची कार्यक्षमता वाढते नवीन संधी, नवीन ज्ञान, तंत्रज्ञान यांना सामोरे जाण्याची व ते स्विकारण्याची क्षमता शिक्षण निर्माण करते.

२. शासनातर्फे आपल्या प्राथमिक गरजा अन्न, वस्त्र, निवारा भागविण्यासाठी कार्यक्रम आखले जातात, त्यास शिक्षणाव्दारे पाठींबा दिला जातो.

३. शासन विविध कल्याणकारी योजना राबविते. (उदा. कुटूंब कल्याण कार्यक्रम, लोकसंख्या नियंत्रण) शिक्षणामुळे लोकांचा अशा योजनांना पाठींबा मिळविता येतो.

४. शिक्षण सात्तयाने व्यक्तिस प्रशिक्षण व प्रगत ज्ञानाच्या सुविधा पुरविते तसेच बदलत्या जागतिक वातावरणास सामोरे जाण्यास व्यक्तीस सिध्द करून समाजाच्या विकासात विधायक भूमिका बजावत असते.

**९. शिक्षण आणि उत्पादन क्षमता :**


अर्थशास्त्र व शिक्षणतज्ज्ञ या दोहोंच्या विचारातूनच शिक्षण प्रणाली ठरत असते. अर्थव्यवस्थेतील निर्मितीची प्रक्रिया आणि औपचारीक शिक्षणातील प्रणाली यांची तुलना, निर्णय प्रक्रिया व उद्दिष्टये यांच्यांशी केली जाते. दुसऱ्या शब्दात सांगायचे म्हणजे औपचारिक शिक्षण प्रणाली ही औद्योगीक प्रणाली प्रमाणेच क्रमबध्द असते. उदा. एका ठिकाणाहून प्राप्त होणाऱ्या कच्च्या वस्तूचे दुसऱ्या ठिकाणी पक्क्या वस्तुत रूपांतर होते. दोन्ही बाजूचा विचार करून त्या वस्तूचे मूल्य ठरविले जाते. याची तुलना औपचारिक शिक्षणाशी करता येऊ शकेल. कच्च्या मालाच्या रूपात विद्यार्थी शिक्षण प्रक्रियेत प्रवेश करतात नंतर शिक्षक, पुस्तके, अभ्यासक्रम व शैक्षणिक साधनांव्दारे त्यांच्यावर (मूल्य) प्रक्रिया होते आणि प्रत्येक स्तरावर त्यांच्या निष्पत्तीचे प्राप्तांकाव्दारे व प्रामणपत्रांव्दारे मूल्यांकन केले जाते.

अर्थशास्त्रात उत्पादनक्षमतेच्या संकल्पनेची ओळख ही कमीत कमी किंमतीतून जास्तीत जास्त उत्पादन क्षमता (निर्मिती) अशी केली जाते.

- कमीत कमी गुंतवणूकीतून जास्तीत जास्त उत्पादन मिळविण्याची प्रक्रिया म्हणजे उत्पादनक्षमता होय.
- याच पध्दतीचा शिक्षणात उपयोग करता येऊ शकतो. अर्थशास्त्रज्ञ त्यासाठी अंतर्गमन व बहिर्गमनाचे विश्लेषण पुढीलप्रमाणे करतात.
- अंतर्गमन (Input) ⟷ बहिर्गमन (Output)

उदा. सार्वजनिक शिक्षण संस्थेतील उत्पादन क्षमता उत्पादीत करण्यासाठी कमीत कमी किंमतीत जास्तीत जास्त साधनांचा वापर केला जातो. त्यासाठी उपलब्ध साधन संपत्तीचा गरजांमध्ये फेरबदल करून खर्च करण्यात येतो.

१. शैक्षणिक उत्पादन क्षमता ही शैक्षणिक निष्पत्तीचे परिणामकारक व कार्यक्षम उत्पादन आहे. (रोले)



(प्रत्येक विद्यार्थ्यानुसार खर्च) (उत्पादन खर्च विश्लेषणाच्या उपयुक्ततेनुसार विद्यार्थ्याचे संपादन)

''उत्पादन क्षमता म्हणजे शाळेच्या रूपाने पुरविलेली चांगली माहिती व प्रभाव पाडणारे इतर विविध घटक नियंत्रित ठेवून प्राप्त झालेली शैक्षणिक निष्पत्ती होय.''

अर्थशास्त्रीय शिक्षणाचा प्रसार करतेवेळी इ.स. १९६० च्या सुमारास जेव्हा आपण उत्पादन क्षमतेविषयी बोलत होतो तेव्हा शूल्ट्झ (१९६३) यांचा असा विश्वास होता की, लोक हे उत्पादक आहेत व ग्राहक हे गुंतवणूकदार आहेत, हे कार्य ते त्यांच्या क्षमतेनुसार करीत असतात. मानवी भांडवलातील सर्वात मोठी गुंतवणूक म्हणजे शाळा अशा वेळी उत्पादकता व शिक्षण याचा संबंध फक्त गृहित धरला जातो. असे असतांना आज आपण पुरेशा पुराव्याव्दारे असे सिध्द करू शकतो की, मानवी भांडवल केंद्रस्थानी ठेवून जगाची अर्थव्यवस्था बदलत आहे. तंत्रज्ञानाच्या बदलामुळे व संगणकाच्या संबंधीत इंटरनेट, ई—लर्निंग, व्हर्च्युअल क्लासरूम (आभासी वर्ग) आणि तंत्र विज्ञानाच्या बदलामुळे तसेच आधुनिक व उच्च तंत्रज्ञानामुळे मानवी भांडवलात काळानुरूप बदल झालेले आहेत. अलीकडील अभ्यासानुसार वेल्च (१९७०) आणि शुल्टझ (१९७५) यांनी असे सिध्द केले की, तंत्रविज्ञान किंवा त्यात होणारे बदल आणि उत्पादनक्षमतेत होणारी वाढ यात समतोलपणा साधण्यासाठी शिक्षण मदत करीत आहे.

देशातील प्रत्येक व्यक्तीला शिक्षण देणे हे शासनाचे काम आहे. हे काम करत असताना केंद्र शासन, राज्य शासन आणि स्थानिक स्वराज्य संस्था यांच्याव्दारे शिक्षण सर्वसामान्यापर्यंत पोहोचविण्याचे काम केले जाते. त्यात स्थानिक स्वराज्य संस्थेची भूमिका अतिशय महत्वाची आहे. यासाठी जिल्हा परिषदा, महानगरपालिका, नगरपालिका, पंचायत समित्या, ग्रामपंचायती यासर्व स्थानिक स्वराज्य संस्थांचा सहभाग अत्यंत आवश्यक आहे.

## संदर्भसूची

### मराठी संदर्भ

*भिंताडे, वि. रा., (२००९), शैक्षणिक संशोधन पध्दती, पुणे, नित्य नूतन प्रकाशन.*
*साळुंके धैर्यशिल (२००८), महाराष्ट्राचा अर्थसंकल्प : एक दृष्टिक्षेप, औरंगाबाद, कैलास पब्लिकेशन्स.*
*गोविलकर, वि. म. (२००५), भारताचा अर्थसंकल्प अर्थ आणि अन्वयार्थ, मुंबई, ग्रंथाली प्रकाशन.*
*भावे, ह. अ., (२०१२), कौटिलीय अर्थशास्त्र, मराठी भाषांतर, पुणे, वरदा प्रकाशन.*
*चव्हाण, दि. आणि मुळे, सं. (२०१३), शैक्षणिक संशोधन आराखडा, नाशिक, इनसाईट प्रब्लिकेशन्स.*
*पाटील, वा. भा, (२०१२), संशोधन पध्दती, जळगाव, प्रशांत पब्लिकेशन्स.*
*सोनवणे व इतर (२०१६), शैक्षणिक संशोधन व संख्याशास्त्र, पुणे, निराली प्रकाशन.*
*भाळवणकर, वा. गो., (२००८), प्राथमिक शिक्षण : सद्य:स्थिती समस्या व उपाय, सुविचार प्रकाशन, पुणे.*